# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २१७-२२** **दिनांक १९/०७/२०२२**

## १२ किलो ८०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करुन आरोपी महिलेला अटक- तुळींज पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाची कारवाई.

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत एक महीला गांजा नावाचा अंमली पदार्थ प्रगती नगर, नालासोपारा पुर्व येथील घरात ठेवुन विक्री करत असल्याची खाञीशीर बातमी तुळींज पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोउनिरी/सुतनासे यांना गुप्त बातमीदाराकडुन मिळाली. सदर बातमीचे अनुषंगाने कारवाई करणेबाबत पोलीस उप आयुक्त यांनी आदेश दिल्याने पोनि/अनंत धांडोरे तसेच गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांचेसह कारवाई करणेकामी टिम तयार करुन प्रगतीनगर, शुभम अपार्टमेंट येथे महिला नामे शबाना असलम शेख यांच्या घराची झडती घेतली असता आरोपीत महिला नामे शबाना असलम शेख वय-३५ वर्षे, रा. प्रगतीनगर, नालासोपारा पूर्व, ता. वसई जि. पालघर ही स्वतःच्या राहत्या घरात १२.८०० किलो वजनाचा एकुण १,९२,०००/- रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ बेकायदेशीर बाळगत असतांना मिळुन आली. सदर बाबत तुळींज पोलीस ठाणे गु. रजि. नं. ४३३/२०२२ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एनडीपीएस ॲक्ट) कलम ८ (क), २० (ब) II (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे अटक आरोपी हिचे विरुध्द अशाच प्रकारचे तुळींज पोलीस ठाणे येथे पुर्वी ३ गुन्हे दाखल आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -२ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कांबळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अनंत धांडोरे, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/मिथुन म्हात्रे, पो.उप.निरी./ बाळु बांदल, सहा.पो.उप.निरी/शिवानंद सुतनासे, पो.हवा/अनिल शिंदे, आनंद मोरे, पो.ना. उमेश वरठा, अशपाक जमादार, विनायक राऊत, इस्माईल छपरीबन, पांडूरंग केंद्र यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.